जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph**.020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - २६ दिनांक - १२/०१/२०२५**

सिंहगड रोड पोलीस स्टेशन,पुणे शहर

# नायलॉन मांज्याची विक्री करणा-या इसमावर छापा टाकुन ११ नायलॉन रिळ केले जप्त.

दि.११/०१/२०२५ रोजी तपास पथकातील पोलीस स्टाफ सिंहगड रोड पोलीस स्टेशन हाद्दीत गुन्हे प्रतिबंधात्मक पेट्रोलिंग करीत असताना मानाजीनगर न-हे पुणे येथे आलो असता, पोलीस अंमलदार अमोल पाटील यांना त्याचे बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, सिध्दी क्लासिक बिल्डींगचे शेजारी व अमोल दांगट याचे चाळी समोर मोकळया जागेत वडगाव बुा पुणे. येथे एक इसम चोरुन शासनाने प्रतिंबंधीत केलेल्या नायलॉन मांज्याची त्यांच्या ओळखीच्या लोकांना विक्री करत आहे. अशी बातमी मिळाली.

सदरची बातमी सहा पोलीस निरीक्षक सचिन निकम यांना कळविली असता, त्यांनी सदरची बातमी वरिष्ठांना कळविल्याने वरिष्ठांनी बातमीची खात्री करुन योग्य ती कारवाई करण्याचे आदेश दिल्याने मिळालेल्या बातमीच्या ठिकाणी जाता सदर ठिकाणी एक इसम उपस्थित होता. त्यास आमची व आमचे सोबतचे पोलीस स्टाफची पंचाची ओळख सांगुन सदर इसमास त्याचे नाव पत्ता विचारता त्याने आपले नाव **योगेश शत्रुध्न शहा वय २० वर्षे रा, नेवसे हॉस्पीटल जवळ, वडगाव बु पुणे,** त्याची पंचासमक्ष झडती घेतली असता, त्याचे जवळ एका खाकी रंगाचे बॉक्स मध्ये ६,५००/-रु. किं.चे ११ नायलॉन मांज्याचे रिळ आढळुन आले ते जप्त करुन त्यांचे विरुध्द सिंहगड रोड पो स्टेशन गुन्हा रजि नं २४/२०२५ भा.न्या.संहिता २०२३ चे कलम २२३, १२५, तसेच पर्यावरण संरक्षण कायदा कलम १९८६ चे कलम ५,१५ अन्वये दाखल करण्यात आला असुन पुढील तपास पोलीस पोलीस अंमलदार संजय शिंदे हे करीत आहेत.

सदरची कामगिरी मा.अप्पर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग पुणे शहर श्री. प्रविणकुमार पाटील मा.पोलीस उप-आयुक्त परी.३ पुणे श्री. संभाजी कदम सहा पोलीस आयुक्त, सिंहगड रोड विभाग, पुणे श्री अजय परमार,सिंहगड रोड पोलीस स्टेशनचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. दिलीप दाईंगडे पोलीस निरीक्षक (गुन्हे)श्री.उत्तम भजनावळे, यांचे मार्गदर्शनाखाली सहा.पोलीस निरीक्षक सचिन निकम, पोलीस उप निरीक्षक, संतोष भांडवलकर, आबा उत्तेकर, पोलीस अंमलदार, संजय शिंदे, आण्णा केकाण, उत्तम तारु, पंकज देशमुख, देवा चव्हाण, अमोल पाटील, विकास पांडोळे, शिवाजी क्षिरसागर, राहुल ओलेकर, स्वप्नील मगर, विनायक मोहीते, विकास बांदल, यांनी केली.